


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

‘ अर्थ एव प्रधानः ’ इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख १२ जून १९४६ अंक २४

—: साठे बिस्किटें :—

श्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसहि पाठवूं शकूं.

——साठे बिस्किट कं., पुणें २

सर्व प्रांतांतील
सुती, गरम व रेशमी
खादीचा सुंदर संच

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

दि विजय टेक्स्टाइल्स लिमिटेड

—येरंडवणा, पुणें ४—

अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल
रु. १,००,०००

भरणा झालेलें भांडवल
रु. ३४,५००

सदर भांडवल २५ रुपयांच्या २००० ऑर्डिनरी शेअर्समध्यें आणि ५० रुपयांच्या ६ टक्के दराच्या १००० प्रेफरन्स शेअर्समध्यें विभागण्यांत आलें आहे.

—मॅनेजिंग एजंटस—
महा–कवडीकर आणि कंपनी

सदर कारखान्यांत नित्योपयोगी सुती कापड तयार होतें.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें.

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—
श्री. धों. कृ. साठे, चेअरमन
श्री. वा. पु. वर्दे, श्री. न. ग. पवार, श्री. श्री. गो. मराठे,
श्री. र. चिं. सोहनी, श्री. मा. रा. जोशी, श्री. त्र्यं. वि. रानडे,
श्री. फ. दो. पद्मजी, श्री. म. वि. गोखले, श्री. मा. वि. शहा.

—भाण्डवल—
अधिकृत रु. ५०,००,००० खपलेलें रु. २५,००,०००
जमा रु. १२,५०,००० रिझर्व्ह व इतर फंड
रु. ३,००,०००
एकूण खेळतें भाण्डवल रु. १,७०,००,०००

—:शाखा:—
डेक्कन जिमखाना, खडकी, मुंबई (फोर्ट) गिरगांव, जळगांव, नागपूर, कोपरगांव, रत्नागिरी, व फैजपूर (पे–ऑफिस)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एक्झिक्यूटर व ट्रस्टी कंपनीचे कामास सुरवात झाली आहे.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

## विविध माहिती

**डालमिया जैन एअरवेज—**श्री. श्रीकृष्ण डालमिया हे डालमिया जैन एअरवेज ह्या नांवाची वैमानिक वहातुकीची एक कंपनी स्थापन करीत आहेत. त्यासाठीं आवश्यक तीं विमानें त्यांनी आधींच खरेदी केलीं आहेत.

**बी. ई. एस. टी.—**बाँबे इलेक्ट्रिक सप्लाय अँड ट्रॅम्वेज कं. लि. ला १९४५ सालीं एकूण ३ कोटी, ३५ लक्ष रुपये उत्पन्न मिळालें. एकूण खर्च २ कोटी, ६५ लक्ष रुपये झाला. घसारा, कराची तरतूद, इत्यादि वजा जातां नफा वाटणीस ३९ लक्ष, ९ हजार रुपये राहिले. कंपनीच्या उत्पन्नापैकीं १ कोटि, ३६ लक्ष रुपये वीज विक्रीचे आहेत. युद्धजन्य औद्योगिक चलती थोडी कमी झाल्यामुळें वर्षाचे अखेरीस कारखान्यांतील विजेचा खप थोडा उतरला. कंपनीचीं एकूण २२९ सबस्टेशन्स आहेत. ट्राम्वेचीं एकूण १ कोटि, ३९ लक्ष तिकिटें खपलीं. बसेसमधून प्रवास करणारांची संख्या १४ लाखांनीं घटली. कंपनीचें वसूल भांडवल ३ कोटि, ३१ लक्ष रुपये आहे आणि रिझर्व्ह व इतर फंड ४ कोटींचे वर आहेत.

**२९ दिवसांचें राजपद—**इटलींत मतनोंदणींत प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेच्या पुरस्कर्त्यांस बहुमत मिळाल्याकारणानें इटलीचे राजे अंबर्टो ह्यांवर देशत्याग करण्याची पाळी आली. त्यांनीं आपल्या गादीचा उपभोग २९ दिवस घेतला.

**श्री. पुराणिकांची शिष्टमंडळांत निवड—**सर एम्. विश्वेश्वरय्या ह्यांच्या नेतृत्वाखालीं हिंदी उद्योगपतींचें एक शिष्टमंडळ इंग्लंड, कॅनडा व अमेरिका ह्या देशांतील औद्योगिक परिस्थितीचें निरीक्षण करण्यासाठीं लवकरच जाणार आहे. शिष्टमंडळांत श्री. धूतपापेश्वर पनवेल लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. जी. व्ही. पुराणिक हे आहेत.

**३८ लक्ष रुपये पट्टी परत—**कोलारच्या सोन्याच्या खाणींच्या तीन कंपन्यांनीं १९४५ सालीं भरलेल्या सोन्यावरील ड्यूटीपैकीं ३८ लक्ष रुपये परत करण्याचें म्हैसूर सरकारनें ठरविलें आहे.

**देशी रेडिओ लवकरच मिळणार—**मोटवाणे रेडिओ मॅन्युफॅक्चरिंग कंपनीचे श्री. व्ही. जी. मोटवाणे हे पूर्ण हिंदी बनावटीचे रेडिओ १९४८ पूर्वी बाजारांत आणणार आहेत. त्यासाठीं इंग्लंड, अमेरिका व कॅनडा येथील रेडिओ कारखान्यांस भेटी देण्याकरितां ते परदेशीं रवाना झाले आहेत.

**भाज्यांच्या लागवडीस उत्तेजन—**भाज्यांची लागवड वाढविण्यासाठीं प्रत्यक्ष उदाहरण घालून देण्याकरितां सरकारी अधिकाऱ्यांनीं आपल्या कचेऱ्यांच्या व सरकारी इमारतींच्या आवारांत भाजा लावण्याची व्यवस्था करावी, अशी त्यांस मुंबई सरकारनें सूचना केली आहे. त्यासंबंधांत त्यांस मार्गदर्शन करण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. सामान्य नागरिक व खासगी संस्था ह्यांसहि ह्या व्यवस्थेचा फायदा घेतां येईल.


तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात

छत्रे यांचा -कोल्हापुरी- संगीत चिवडा
वापरून पाहुण्यांस खूष ठेवा.
किंमत १ रत्तलाला २ रुपये.
मालकः—एन. व्ही. वेलणकर, गिरगांव रोड
फो. नं. ३३८४९ ] मुंबई ४.

सांडू प्रेग युटेरो
गरोदर स्त्री व गर्भ यांस पोषक
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड. (चेंबूर, मुंबई)
पुणें चीफ एजंटसः—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक पुणें,

ज्वरबिंदू







फाऊंटन पेनकरितां
लोटस
शाई
सर्वत्र मिळते.

पंढरीनाथ ब्रिलिअन्टाईन वापरा



# शेअर्सच्या तारणावरील ओव्हरड्राफ्ट

## कर्जांच्या तपशिलाची रिझर्व्ह बँकेकडून मागणी

शेअर्सच्या तारणावर बँकांकडून मोठें कर्ज मिळूं शकतें, ह्या सवलतीचा दुरुपयोग करून कित्येक लोक सट्टेबाजी वाढवीत आहेत, अशी आज कित्येक दिवस कुरबूर ऐकूं येत आहे. मोठ्या शहरांतिल बँकांचा शेअर्सचे तारणावर कर्जें देण्याचा व्यवहार अवाढव्य प्रमाणावर चालतो. विशेषतः जेथें स्टॉक एक्सचेंजेस आहेत अशा ठिकाणीं तर हीं कर्जें फारच आढळतात. कारण ज्या शेअर्सची किंमत वाढण्याचा संभव आहे असे शेअर्स खरीदण्यासाठीं सट्टेवाल्यांना पैसे हवे असतात. आणि ते उभे करण्यासाठीं त्यांचेजवळ तारण देण्यास शेअर्सही पुष्कळ असतात. मामुली काळांत अशा शेअर्सची किंमत फार वर-खाली जात नाहीं आणि बँकेने त्यांच्या किंमतीच्या ८०% ते ९०% पर्यंत कर्जें देण्यांत धोका नसतो. किंमत अपेक्षेबाहेर उतरली, तर जरूरीप्रमाणें शेअर्स तात्काळ विकून बँकेस आपले पैसे उभे करतां येतात. शेअर्सच्या मालकीबद्दल बँकेस फारशी चौकशी करण्याचें कारण नसतें. कारण ते शेअर्स कंपन्यांच्या बुकांत नोंदलेलेच असतात. शेअर्सची रकम पूर्ण भरलेली आहे किंवा नाहीं, ते प्रेफरन्स आहेत का ऑर्डिनरी आहेत, त्यांवर डिव्हिडंड किती काळ व कोणत्या दराने दिलेलें आहे, त्यांची किंमत आजवर कितपत वर–खालीं गेलेली आहे इत्यादींचा काळजीपूर्वक विचार करून बँका किती मार्जिन राखून कर्जें द्यावयाचीं हें ठरवितात. वक्तशीर ठराविक डिव्हिडंड देणाऱ्या एखाद्या रेल्वे कंपनीच्या शेअरची किंमत स्थिर असते, अशा १०० रुपयांच्या शेअरवर ९५ रुपये बँकेने कर्ज दिलें तरी भरमसाट हेलकावे खाणाऱ्या एखाद्या डिफर्ड शेअरच्या किंमतीच्या ७५% सुद्धां कर्ज देण्यास बँक तयार होणार नाहीं. त्याचप्रमाणें दहा वीस वर्षें डिव्हिडंड न दिलेल्या शेअरला गिऱ्हाईकच नसेल तर त्याच्या दर्शनी किंमतीच्या २५%इतकेंही कर्ज कोठें मिळूं शकणार नाहीं.

### शेअर्सचे वाढते भाव

गेल्या वर्ष-सहा महिन्यांत हिंदुस्थानांतील शेअर्सचे बाजारभाव कमालीचे वाढले आहेत. रिझर्व्ह बँकेचा शेअर डिसेंबर, १९४४ अखेर १३४ रुपये होता तो डिसेंबर १९४५ अखेर १५८ रुपये झाला आणि आतां तो १७५ रुपयांवर गेला आहे. टाटा ऑर्डिनरी १९४५ मध्यें ४८२ वर कधीं गेला नाहीं; त्याची किंमत आतां ५६० चे आसपास आहे. टाटा डिफर्डची १९४५ मधील कमाल किंमत २,६७५ होती; तो आतां ३,१०० चे वर गेला आहे. हीच प्रवृत्ति बहुतेक शेअर्सचे बाबतींत आढळते. सरकारने व्याजाचे दर अगदीं खाली राखण्याचें स्वीकारलेलें यशस्वी धोरण मुख्यतः त्याच्या मुळाशी आहे. इतर ठिकाणीं पैसे गुंतविण्यास किफायतशीर जागेचा अभाव, नव्या भांडवल उभारणीवरील सरकारी निर्बंध, यंत्रसामुग्रीसारखा महाग माल विकत मिळण्याची अशक्यता, इत्यादि इतरहि अनेक कारणें आहेत, तीं दुय्यम महत्त्वाचीं आहेत. कित्येक कंपन्यांचे बहुसंख्य शेअर्स आपल्या ताब्यांत आणण्याची कांहीं सट्टेवाल्यांची कारवाई चालू आहे, त्यामुळें त्या कंपन्यांच्या शेअर्सचे भाव अचानकपणें आणखी कडाडतात. त्या शेअर्सची मूलग्राही किंमत व त्यांचा बाजारभाव ह्यांचा काडीमात्रहि संबंध उरत नाहीं. बँकांकडे सर्व तऱ्हेचे शेअर्स कर्जास तारण म्हणून येत असतात; तेव्हां कर्ज देण्यापूर्वी बँकांनी ह्यासंबंधांत काळजीपूर्वक लक्ष घालणें आवश्यक असतें. शेअर्समधील सट्टेबाजीचे दुष्परिणाम वेळींच टाळले नाहींत, तर सट्टेवाल्यांबरोबर बँकाहि गोत्यांत येण्याचा संभव असतो.

### 'मार्जिन'चा प्रश्न

बँकांमध्यें तीव्र स्पर्धा चालू असल्यानें, गिऱ्हाईक आकर्षित करण्यासाठी व आपला व्यवहार वाढविण्याची घाई करण्याकरितां सावधगिरी बाजूस राखून कित्येक बँका शेअर्सचे तारणावर मर्यादेबाहेर कर्जें देत आहेत आणि त्याचा गैरफायदा सट्टेवाल्यांस मिळत आहे, अशी रिझर्व्ह बँकेची खात्री झालेली दिसते. बँकांची कर्जें देण्याची तत्परता आणि सट्टेवाल्यांचा तीं घेण्याचा आधाशीपणा हीं जुळून आल्यावर होणारे दुष्परिणाम घातुक ठरल्याविना रहाणार नाहींत. रिझर्व्ह बँकेचें लक्ष ह्या परिस्थितीकडे आहे असें दिसून येतें. कारण शेअर्सचे तारणावरील कांहीं विशिष्ट मर्यादेपलीकडील रकमांवरील ओव्हरड्राफ्ट्सचा तपशील तिने जाइंट स्टॉक बँकांकडून मागविला असल्याचें प्रसिद्ध झालें आहे (आर. आर. नाबर आणि कं. चा साप्ताहिक मार्केट रिपोर्ट) शेअर्सच्या बाजारांतील किंमतींच्या मानाने फारच मोठी रकम बँका देतात. आणि असें करणें सध्याच्या शेअरबाजारच्या परिस्थितींत अत्यंत धोक्याचें आहे,हीच विचारसरणी रिझर्व्ह बँकेच्या सर्क्युलरचे मुळाशीं असली पाहिजे हें उघड आहे. शेअर्सवरील कर्जें किती मार्जिन ठेवून द्यावीं हें शक्य तर प्रथा पाडून ठरविण्यांत यावें, त्यासाठी कायद्याची आवश्यकता निर्माण होऊं नये, अशी रिझर्व बँकेची अपेक्षा दिसते. सर्व बँकांनी सहकार्यानें हा प्रश्न सोडवला तर तें फार सोईचें होणार आहे. १९२९ सालीं अमेरिकेंतील स्टॉक एक्सचेंजची आपत्ति व तिचे परिणाम ह्यांचा दाखला रिझर्व्ह बँकेने दिला आहे. वेळींच घेतलेल्या ह्या खबरदारीवरून बँकांची ही मध्यवर्ती संस्था आपल्या जबाबदारीस जागरूक आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. रिझर्व बँकेला सर्व हिंदी बँकांचें सहकार्य ज्या प्रमाणांत मिळेल त्या प्रमाणांत तिचें कार्य सुलभ होणार आहे. शेवटीं कायद्याचा आधार रिझर्व्ह बँकेस आहेच.

### कर्जांचा इन्फर्मेशन ब्यूरो

सट्टेवाले एकाच बँकेकडून कर्ज काढतात, असें नसून अनेक बँकांचीं कर्जें ते घेतात. कर्जदाराने इतर बँकांकडून किती कर्ज घेतलेलें आहे, हें प्रत्येक बँकेस कळण्याचें साधन नसतें. त्यामुळें, एकाच कर्जदारास त्याच्या ऐपतीच्या व पतीच्या मानाने भरमसाट कर्ज मिळूं शकतें. ही गोष्ट बँकांच्या दृष्टीने केव्हांहि अनिष्ट अशी आहे. सर्व बँकांनी आपल्या खातेदारांचा व त्यांस दिलेल्या कर्जांचा तपशील रिझर्व्ह बँकेकडे देत जावा आणि अशा रीतीने कर्ज घेणारांसंबंधीं संकलित माहिती एकत्रित होऊन तिचा फायदा कर्जें देणाऱ्या बँकांस व्हावा, अशी इन्फर्मेशन ब्यूरोची एक कल्पना रिझर्व्ह बँकेने मांडली असून तिचेवर बँकांचें मत मागितलें आहे असें समजतें. आजहि बँकर्स खासगी रीतीनें एकमेकांस कर्जदारांच्या लायकीसंबंधीं सल्ला विचारतातच, परंतु त्याचें प्रमाण सहाजीकच अत्यंत मर्यादित असतें आणि विशेष शंका आली तरच ते ह्या भानगडींत पडतात. एखाद्या मध्यवर्ती इन्फर्मेशन ब्यूरोकडे कर्जदारांनी सर्व बँकांकडून घेतलेल्या कर्जाचे एकूण रकमेबद्दल व त्याच्या तारणाबद्दल खात्रीशीर माहिती मिळूं शकली तर बँकांची मोठीच सोय होणार आहे. ही माहिती बँकांकडून गोळा केली जाणार व बँका कर्जदारांकडूनच ती मिळविणार, हें उघड आहे. ही माहिती अगदीं ताजी व विश्वासार्ह राखण्यावरच तिची उपयुक्तता अवलंबून राहील हें स्पष्ट आहे. रिझर्व्ह बँकेस

नियोजित बँकिंग कायद्याने फार व्यापक अधिकार दिले आहेत, त्यांचा उपयोग करण्याचा रिझर्व्ह बँकेचा बेत दिसतो, असें वरील हालचालीवरून म्हणण्यास हरकत नाहीं. शेअर्सवरील 'कर्जांवर नियंत्रण आणि कर्जदारांच्या कर्जावर देखरेख ह्यांचा बँकांचे व्यवहारावर इष्ट परिणाम निश्चित होईल. चांगल्या पद्धतीने चालवलेल्या बँकांस ह्या उपक्रमाची कांहींच भीति वाटण्याचें कारण नाहीं. अयोग्य व्यवहार ज्या बँका करीत नाहींत, त्यांस नियंत्रण जाचक होणार नाहीं, इतकेंच नव्हे तर भासणारहि नाहीं. शेअर्सच्या किंमतींतील भरमसाट वाढीस रिझर्व्ह बँकेची ही हालचाल पोषक होणार नाहीं, हें सहज लक्षांत येण्याजोगें आहे.

## इंग्लंड-अमेरिका व रशिया

### लोकशाही व कम्युनिझम ह्यांचा झगडा

दुसरें जागतिक महायुद्ध पूर्णपणें संपून अजून पुरें वर्षही लोटलें नाहीं तोंच विजयी राष्ट्रत्रयींत दोन तट आतां उघडपणें पडले आहेत. जर्मनीविरुद्ध इंग्लंड-फ्रान्स युद्धांत उतरण्यापूर्वी इंग्लंडचें हुजुरपक्षीय सरकार असें म्हणत होतें कीं, केवळ राजकीय तत्त्वज्ञानाचा झगडा लढण्याची इंग्लंडला जरूर वाटत नाहीं. पण अखेर इतिहासाच्या तर्कशास्त्राला मान तुकवून नाझीवादाविरुद्ध इंग्लंड-फ्रान्सच्या लोकशाहीला शस्त्र उपसावें लागलें. पुढें १९४१ च्या जूनमध्यें सोव्हिएट रशियावर जर्मनीने आक्रमण केल्यावर मि. विन्स्टन चर्चिल यांनीही तेवढ्यापुरता कां होईना पण सोव्हिएट रशिया व कम्युनिझमबद्दलचा द्वेष दडपून ठेऊन रशियाशीं सहकार्य केलें व २० वर्षें मुदतीचा स्नेहाचा करारही केला. युद्ध संपल्यावर मि. चर्चिल यांचें सरकार ब्रिटिश मतदारांनी अधिकारावरून दूर केलें आणि त्याच्या जागीं प्रस्तुत अधिकारावर असलेल्या मजूर सरकारला स्थानापन्न केलें. हें मजूर सरकार इंग्लंडमध्यें समाजवादी राज्यघटना आणण्याच्या कार्यक्रमावर निवडून आलेलें असल्यामुळें परराष्ट्रीय धोरणांत तें जागतिक लोकशाहीला उत्तेजन देईल अशी बऱ्याच पुरोगामी लोकांची अपेक्षा होती, परंतु मजूर सरकारचे हल्लींचे परराष्ट्रमंत्री मि. बेव्हिन यांनीं पार्लमेंटमध्यें नुकत्याच केलेल्या भाषणाची मि. चर्चिल यांनी तारीफ केली या एकाच गोष्टीवरून मजूर सरकारचें परराष्ट्रीय धोरण हुजूर पक्षीयांचीच आवृत्ति आहे, असें वाटूं लागलें आहे.

### ॲटम बाँबचा राजकारणावर परिणाम

तथापि आजच्या जागतिक राजकारणांत ब्रिटिश मजूरमंत्रिमंडळाच्या परराष्ट्रीय धोरणाला जें महत्व प्राप्त झालें आहे तें निराळ्याच कारणामुळें. जपानवर ॲटम बाँबचा प्रयोग झाल्याबरोबर अँग्लो-अमेरिकन सरकारांच्या दृष्टिकोणांत एकदम फरक पडला. 'ऑब्झरव्हर' या टोरी पक्षाच्या इंग्लंडमधील वृत्तपत्रानें तर लष्करी सत्तेचा निर्णायक गुरुत्वमध्य ॲटमबाँबच्या शोधाने इंग्लंड-अमेरिकेच्या बाजूकडे झुकवला आहे असे सूचक विचार प्रदर्शित केले. आणि या वृत्तपत्राचे विचार आजच्या आंतरराष्ट्रीय राजकारणांत डावपेंचाच्या रूपाने हरघडी प्रत्ययास येत आहेत. इंग्लंड-अमेरिका विरुद्ध सोव्हिएट रशिया असे गट आज पडलेले आहेत ही गोष्ट आतां कोणालाही नाकबूल करतां येण्यासारखी राहिलेली नाहीं. न्यूयार्कमधील मॅडिसन स्क्वेअर गार्डनमध्यें रशिआचे वॉशिंग्टनमधील वकील अँड्री ग्राम्यूको यांनी नुकतेंच एक जाहीर भाषण केलें. या भाषणांत त्यांनीं इंग्लंड-अमेरिकेच्या सरकारांवर असा आरोप केला कीं, संयुक्त राष्ट्रसंघटना ज्या उद्देशाने स्थापन करण्यांत आली तो बाजूलाच राहून या संस्थेचा उपयोग रशियाला बदनाम करण्याकडे बुद्धिपुरस्पर करण्यांत येत आहे. रशियन परराष्ट्रमंत्री एम. मोलोटाव्ह यांनींही अशाच प्रकारचा आरोप आपल्या दोस्तांवर केलेला आहे. उलट ब्रिटिश परराष्ट्रमंत्री मि. बेव्हिन यांनीं रशियासंबंधीं बोलतांना असे उद्गार काढले कीं, सर्व जगभर सोव्हिएट समाजपद्धति अस्तित्वांत आल्याशिवाय आपण पूर्णपणें सुरक्षित होऊं शकत नाहीं अशी जी रशियन राज्यकर्त्यांची कल्पना झालेली दिसते ती वस्तुस्थितीस सोडून आहे. पॅरिसमध्यें नुकत्याच झालेल्या परराष्ट्रमंत्र्यांच्या अयशस्वी परिषदेचा दोष मि. बेव्हिन यांनीं रशिअन शिष्टमंडळावर लादला. मि. बेव्हिन यांनीं आपल्या भाषणांत पार्लमेंटरी पद्धतीची लोकशाही व रशिअन कम्युनिझम यांचा सध्यां जो झगडा युरोपमध्यें चाललेला दिसतो त्याची स्पष्ट कबुलीच दिली आहे.

### विरोधी धोरणांचें समर्थन

रशियन धोरणाचें समर्थन करणाऱ्या गटांचें म्हणणें असें आहे कीं सोव्हिएट राज्यकर्त्यांना इंग्लंड-अमेरिकेविषयीं जो अविश्वास वाटतो त्यास इंग्लंड-अमेरिकाच जबाबदार आहे. पहिली गोष्ट अशी कीं ॲटम बाँबच्या कृतीची माहिती रशियाला देण्याची अमेरिकेची तयारी नाही. येथूनच या अविश्वासाला प्रथम सुरवात झाली. त्यानंतर संयुक्त राष्ट्रसंघटनेंत अर्जेंटायनासारख्या फॅसिस्ट राष्ट्राला स्थान असूं नये असें रशियाचें म्हणणें असतां इंग्लंड-अमेरिकेने छोट्या राष्ट्रांच्या मताच्या जोरावर रशियाच्या सूचनेला विरोध करून आपला हट्ट तडीस नेला. राष्ट्रसंघाच्या सनदेंत विश्वस्तांची जी योजना आहे तींत विश्वस्त प्रदेशांना पूर्ण स्वातंत्र्य ' देण्याचा अंतिम हेतु असावा अशी रशिआची सूचना होती, तीही इंग्लंड-अमेरिकेनें फेटाळली. संयुक्त राष्ट्रसंघटना अशा रीतीने इंग्लंड-अमेरिकेच्या हातचें बाहुलें होऊं लागलेलें पाहून रशिया आपल्या संरक्षणाची स्वतंत्र व्यवस्था करूं लागला असें सोव्हिएट रशियाच्या बाजूनें म्हणतां येण्यासारखें आहे.

मि. बेव्हिन यांनीं गेल्या आठवड्यांत कॉमन्ससभेमध्यें जें भाषण केलें त्यांतील तपशील बाजूला ठेवला तर दोन प्रमुख मुद्दे शिल्लक उरतात: (१) बाल्कन्समधील राजकारण केवळ रशियाच्या तंत्राने चालूं देण्याची त्यांची तयारी नाही. आणि (२) मध्य पूर्वेवर रशियाची पडत चाललेली सावलीहि त्यांना अप्रिय आहे. मि. बेव्हिन यांच्या भाषणावरील राजकीय मुलामा डोळ्याआड केला तर वरील दोन भूप्रदेशांतील ब्रिटनच्या आर्थिक व लष्करी हितसंबधांचें रक्षण करण्याचा त्यांचा इरादा उघड दिसून येतो. पॅरिसमध्ये ता. १५ जून रोजीं पुन्हा भरणाऱ्या बड्या परराष्ट्रमंत्र्यांच्या परिषदेंत हे सर्व मुद्दे अधिक स्पष्ट भाषेंत मांडले जाऊन कांहींतरी तडजोड करण्याचा प्रयत्न होणें जरूर आहे.

---

**महाराष्ट्रांत शास्त्रज्ञांचा अभाव !**—ब्रिटिश साम्राज्यांतील शास्त्रज्ञांची एक परिषद लंडन येथें १७ जून रोजीं सुरू होणार आहे. ह्या परिषदेस हिंदी शास्त्रज्ञांस रॉयल सोसायटीने आमंत्रण केलें आहे, तें हिंदुस्थान सरकारने मान्य करून १४ प्रमुख शास्त्रज्ञांची निवड केली आहे. त्यांत एकहि महाराष्ट्रीय नाहीं.

**पेट्रोलचें रॅशनिंग चालू**—येत्या ऑगस्टपासून पेट्रोलचें रॅशनिंग बंद होणार आहे, अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे, ती निराधार आहे.

## पूना कमर्शिअल हायस्कूल

डेक्कन इन्स्टि. ऑफ कॉमर्स या व्यापारी शिक्षण देणाऱ्या संस्थेनें यंदापासून नवीन अत्यंत व्यवहारोपयोगी, सरकार व विद्यापीठ मान्य असा शिक्षणक्रम शिकविण्याचें ठरवून " पूना कमर्शिअल हायस्कूल " ची स्थापना चालू सालच्या वर्षप्रतिपदेचे दिवशीं पुणें येथें केली. ता. १७ जूनपासून या हायस्कूलचे वर्ग सुरू होत आहेत.

व्यापारी शिक्षणाची पूर्ण सोय या हायस्कूलमुळें पुणें येथें होत आहे. कॉमर्स कॉलेज पुणें येथें झालें व त्यामुळें उच्च व्यापारी शिक्षणाची सोय झाली. परंतु या कॉलेजांत प्रवेश मिळविल्यानंतर तेथें शिकविण्यांत येणारे कांहीं विषयांची चांगली ओळख जर अगोदरच विद्यार्थ्यांस झाली तर त्यास कॉमर्स कॉलेजचा अभ्यासक्रम पुरा करण्यास मदतच होईल. या दृष्टीनें या हायस्कूलचें महत्त्व फार आहे.

तसेंच युनिव्हर्सिटीची मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण होऊन नंतर ज्या विद्यार्थ्यांस उच्च शिक्षण घेतां येत नाहीं परंतु नोकरी पेशा पत्करावा लागतो त्यांचे दृष्टीनें या हायस्कूलमध्यें दिलें जाणारें शिक्षण फार मोलाचें आहे. उत्तम इं. व देशी जमाखर्चाची माहिती, व्यापारी पद्धतीचा इंग्रजी व मराठी पत्रव्यवहार, शार्ट-हँड, टाइपरायटिंग; व्यापारांतील बँकिंग, विमा, वहातूक इत्यादि विषयांची माहिती या विद्यार्थ्यांस दिली जाईल व मॅट्रिकनंतर हे विषय शिकण्यासाठी स्वतंत्र वेळ यावयास नको. प्रो. कृ. ग. भोपटकर यानीं डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स द्वारें व्यापारी शिक्षणाची सुरवात पुणें शहरांत प्रथम केली. शिक्षणक्षेत्रांत संस्थेनें आपलें नांव चांगलेंच मिळविलें आहे. विशेषतः बुक-कीपिंगसारखा अवघड समजण्यांत येणारा विषय शिकविण्यांत इन्स्टि. ची प्रसिद्धी आहे व हा विषय श्री. धूपकर हे स्वतःच या हायस्कूलमध्यें शिकविणार आहेत. श्री. धूपकर यानीं हा विषय नू. म. वि. हायस्कूलमध्यें गेलीं साडेतीन वर्षें इं. ४ व ५ या वर्गांस शिकविला आहे, व या विषयास L. C. C. च्या एलिमेंटरी परीक्षेस दरसाल विद्यार्थी पाठविले आहेत. इतर विषय शिकविण्यासाठींही योग्य शिक्षक नेमण्याची व्यवस्था झाली आहे. प्रथम इं. ४ थी व ५ वी चे वर्ग सुरू होतील व ६ वी व ७ चे वर्ग यथाक्रमानें सुरू होतील. पालकांनीं या हायस्कूलमध्यें विद्यार्थी पाठवून या शिक्षणाचा फायदा घ्यावा, व धनिकांनीं या स्तुत्य उपक्रमास जरूर मदत करावी. डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्सची गेली २८ वर्षांची जनसेवा लक्षांत घेतां त्यांना या नव्या उपक्रमांतही संपूर्ण यश येईल व येवो.

---

**पोस्ट कार्डे**—१ जुलैपासून पोस्ट कार्डांची किंमत २ पैसे करण्यांत आली आहे. म्हणजे ती आतां १९३१ च्या पूर्वीच्या किंमती इतकी झाली आहे. दरसाल सुमारें ५० कोटि पोस्ट कार्डें खपतात असा अंदाज आहे.

**मि. जोन्स**—ओरिएंटल विमा कंपनीचे मॅनेजर मि. एच. ई. जोन्स हे कंपनीची ३४ वर्षें नोकरी करून नुकतेच सेवानिवृत्त झाले, त्यांपैकी २४ वर्षें ते मॅनेजर होते. त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांस दरमहा १५०० रुपयांचा स्पेशल आलावन्स कंपनीच्या डायरेक्टरांनीं दिला आहे.


**कानपूरमधील भांडवल ब्राझीलकडे चाललें**—सर हेन्री हॉर्समन व त्यांचे बंधू ह्यांनीं स्वदेशी मिल्समधील आपले शेअर्स विकून मिळविलेले ४ कोटि रुपये ब्राझील देशांत गुंतविण्याचें

**१५ कोटि रुपयांच्या कर्जांची तडजोड पाहिजे**

बॉंबे अॅ. डे. रिलीफ अॅक्ट प्रथम १९४२ सालीं पंचमहाल, सुरत, ठाणें, प. खानदेश, पुणें, सोलापूर, धारवाड व विजापूर, ह्या जिल्ह्यांतील निवडक तालुक्यांस व पेठ्यांस लागू करण्यांत आला आणि आठ कर्जतडजोड बोर्डांची स्थापना झाली. १९४५ सालीं कायद्यांत दुरुस्ती करण्यांत आली आणि आणखी ४३ नवीं कर्जतडजोड बोर्डें स्थापन करण्यांत आलीं. आतां मुंबई प्रांतांतील ९६ तालुक्यांस व पेठ्यांस हा कायदा लागू करण्यांत आला आहे. वर निर्दिष्ट केलेल्या आठ बोर्डांनीं जून १९४५ अखेर १०,२१३ प्रकरणांतील २७,५०,००० रुपयांचीं कर्जें रद्द करून टाकलीं. ह्यावरून कर्ज तडजोडीमुळें शेतकऱ्यांस मिळणाऱ्या सवलतीची कल्पना येईल.


श्रेष्ठ औषधें
रक्तशुद्धीसाठीं
सुवर्ण रक्तम्
शक्ती व स्फूर्तीसाठीं
हेमो फॉस्फोटोन
मलेरियाकरितां
मेलगो
प्रदरादि स्त्री रोगांवर
सुवर्णा
स्टॉकिस्ट
भारत जनरल स्टोअर्स
लालबाग, मुंबई.
जे. एम. को. फार्मा वर्क्स
पनवेल.





अधिक धान्य पिकविण्याची योजना
—यशस्वी होण्यास—
किर्लोस्कर पंपिंग सेटस
हें अमोघ साधन आहे.
त्याचें सहाय घ्या !
किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

## शेअर बाजार

ले.:-श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम., पुणें ५.

सरकारनें साडेतीन टक्के रोखा परत करून टाकण्याची नोटीस दिल्यापासून रोखे व शेअर बाजारांची मजबुती चांगलीच वाढली आहे. साडेतीन टक्क्यांऐवजीं तीन टक्के बिनमुदतीचा अथवा पावणेतीन टक्के १९७६ चा ९९ रु. ला ऑगस्ट, सप्टेंबरमध्यें देण्यांत येणार आहे अथवा रोख पैसे देण्यांत येतील. मात्र नवीन रोखा रोकडीस मिळणार नाहीं. याचा अर्थ असा कीं जे लोक व संस्था ठराविक खर्चाची तरतूद साडेतीन व्याज येईल या हिशेबावर करून बसले होते त्यांचा अर्धा टक्का याच्यापुढें साफ उडाला. पूर्वीइतक्याच व्याजाची अपेक्षा असेल तर आणखी मुद्दली वाढ करावयास हवी. याउपर सध्याच्या १०३ आसपासच्या भावांत साडेतीन टक्का विकून टाकावा तर आलेला पैसा दुसऱ्या कोठल्याही रोख्यांत टाकण्याची सोय नाहीं. कारण एका रात्रींत बाकीच्या रोख्यांचे भाव दोन अडीच टक्क्यांच्या पातळींत येऊन बसलेत. तेव्हां साडेतीन टक्के रोखेदारांना कुठलीच फायदेशीर हालचाल करण्यास वाव नाहीं. सप्टेंबरपर्यंत हा रोखा ठेवून त्याऐवजीं तीन टक्के रोखा घेणें हाच श्रेयस्कर मार्ग. मात्र हा रोखा जरी बिनमुदतीचा असला तरी तो १९८६ नंतर तीन महिन्यांच्या नोटिशीनें परत होण्याचा संभव आहे. तीन टक्के रोख्यांचा भाव यापुढें आहे असाच मजबूत राहील असें वाटतें. ज्यांना ट्रस्ट कायदा लागू नाहीं अशा व्यक्तींनीं रोखे विकून हायड्रो, पॉवर, टाटा स्टील सेकंड हे ठराविक व्याजाचे शेअर्स उचलल्यास व्याज थोडें जास्त सुटेल व भांडवलही सुरक्षित राहील.


शेअरबाजाराची मजबुती सध्यातरी कायम टिकेल असें दिसतें. सट्टेबाजी आवळण्याच्या दृष्टीनें सरकार काय मार्ग अवलंबितें तें बाहेर आल्यास भाव नरमतील असें वाटतें. तसेंच नवें सरकार आल्यास थोडी नरमाईच यावी, मात्र व्याजाच्या कल्पनाच मुळांत वर सांगितल्याप्रमाणें बदलल्या गेल्याकारणानें फार मोठी मंदी शेअरबाजारांत सध्यां येण्याचा संभव दिसत नाहीं. प्रतिक्रिया स्वरूपाची मंदी आल्यास चटकन नफा घेण्याच्या दृष्टीनें टाटा आर्डिनरी घेण्यांस बरा दिसतो.

**ब्रिटिश रेल्वे दरांत वाढः**—इंग्लंडमधील रेल्वे उतारूंच्या तिकिटाचे दर १९३९ च्या मानानें आतां १६$\frac{2}{3}$% जास्त आहेत ते वाढवून ३३$\frac{1}{3}$% जास्त करण्यांत यावयाचे आहेत. मालवहातुकीच्या दरांतही १६$\frac{2}{3}$% पासून २५% पर्यंत वाढ व्हावयाची आहे. कामगारांच्या मजुरीचे दरांत ६०% व मालाचे किमतींत ९०% वाढ झाली आहे ती भरून काढण्यासाठीं वरीलप्रमाणें दर वाढवावे लागले आहेत, असें प्रसिद्ध झालें आहे.

**रेल्वेच्या बसेस वाढणारः**—रेल्वेजवरील उतारूंची गर्दी कमी करण्यासाठीं आणखी मोटार बसेस सुरू करण्याचा रेल्वे अधिकाऱ्यांचा विचार आहे. बेळगांव, कोल्हापूर, सातारा रोड, कऱ्हाड, मिरज, नाशिक, मनमाड, अहमदनगर, सोलापूर, विजापूर, पंढरपूर, बारामती, इत्यादि ठिकाणच्या प्रवासाची त्यामुळें चांगली सोय होईल.

**चेकच्या आकारावरील निर्बंध रद्द**—बँकांच्या चेकच्या कागदाचा कमाल आकार ठरविणारी एक दुरुस्ती हिंदुस्थान सरकारनें १९४५ सालीं पेपर कंट्रोल ( इकॉनॉमी ) ऑर्डरमध्यें केली होती. ही दुरुस्ती करणारें ३२ वें कलम सरकारनें आतां रद्द केलें आहे. त्याचा अर्थ, चेकचा कागद वाटेल तेवढा मोठा ठेवण्यास प्रतिबंध उरलेला नाहीं.


बिनचूकच्या माहितीनें
स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.
किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.
१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.
—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, मुंबई नं. २७.
पूना स्टॉकिस्ट: सिताराम एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.
:इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत:

पेडणेकर आणि कंपनी लि.,

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २७७३८



मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

महाराष्ट्र शारदेची तेजस्वी ग्रंथरत्नें वाचून
पैसा व ज्ञान मिळवा !
श्रीमंत कसें व्हावें—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हजारों रुपये मिळवून देतो. वाचून लक्षाधीश व्हा ! किं. १॥ रु.
१०० टक्के यश—हें भाग्यवर्धक पुस्तक तुम्हांला व्यवहार, व्यापार व उद्योगधंदे यांत बिनचूक यश कसें मिळवावें तें शिकवील आणि कर्तबगार बनवील ! किं. १॥ रु.
काम आणि कामिनी—तरुण स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक कामसौख्याचें सुंदर मार्गदर्शन करतें व स्त्रीस्वभावाची खरी कल्पना देतें। अत्यंत लोकप्रिय. किं. १॥ रु.
मृत्युलोकचा प्रवास—मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींच्या सुरम्य कथा. वाचून थक्क व्हाल ! किं. १ रु.—चारी पुस्तकें एकत्र घेतल्यास पोस्टेज माफ !
मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास, ८२३, शिवाजी नगर, ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

व्याज-वजा ,
+इंडि. यु. ऑ. ०-१५-० दि. १०-६-४५
+इंडि. यु. डि. ०-३-० दि. १०-६-४५
सिंप्लेक्स रु. १ दि. ४-७-४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार ४।६।४६ | बुधवार ५।६।४६ | गुरुवार ६।६।४६ | शुक्रवार ७।६।४६ | सोमवार १०।६।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | ३१०५-० | ३०७५—० | ३०८६-४ | ३०९८-१२ | ३११७-८ |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५५८—० | ५५०—८ | ५५४—८ | ५५७-८ | ५६०—८ |
| २२२२-८; १७६३-१२ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २६०५-० | २५७६—४ | २५८३-१२ | २५९१-४ | २६१०-० |
| ७०२; ५६६ | १९——० † | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ९७१—० | ९५९—० | ९६०—० | ९६५-० | ९७२—० |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ८४४—० | ८४०—० | ८३९—० | ८४१-० | ८४७—० |
| ४४३-८; ३६० | ५-०-० † | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ४८६—० | ४८१—० | ४६९—० | ४६५-८ | ४७५—८ |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ४६६—० | ४६२—० | ४५८—० | ४७४-० | ४७३—० |
| ३३५; २८३-८ | ८-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ४०६—० | ४००—० | ३९८—० | ४०१-० | ४०३—० |
| ३३७; २४३ | ९-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४५१—० | ४४३—० | ४४१—० | ४४३-८ | ४४६—८ |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ५-८-० | ५-६-६ | ५--६ | ५-६-६ | ५—७ |
| १७१०; १३-७-० | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | २३-७-६ | २३—५ | २३—५ | २३—९ | २२-१२-६+ |
| ३-१०; २-९ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | ४-११-३ | ४—१० | ४-९-६ | ४-१०-६ | ४-७-६+ |
| ७९०; ६४५ | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ९६१-४ | ९५०—० | ९४६-४ | ९५६-६ | ९५२—८ |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २६०—० | २५८—० | २५७—० | २५९-० | २६०—८ |
| २५६; २१३-८ | ८-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | ३०५—८ | ३०३—० | ३२०—० | ३२५-० | ३३२—० |
| ५९२-८; ५१०-०-० | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६७२—८ | ६६७—८ | ६६७—८ | ६७२-८ | ६९३—१२ |
| ४३-७; ३०-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ५१—० | ५०—१४ | ५२—६ | ५४-४ | ५४—१२ |
| | | | ३½% रोखे | १०० | १०३-६-६ | १०३—७ | १०३—७ | १०३-१० | १०३-१० |

मंगळवार दि. ११-६-४६ ला पारशी सणानिमित्त बाजार बंद होता. गुरुवार दि. १३-६-४६ बाजार बंद आहे.

सोमवार दि. १०-६-४६ चे भाव

| ३% गव्हर्मेंट लोन्स | | बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४६ | १०१-४ | बरोडा | २१८-० | आंध्रा व्हॅली | ११५२-८ | अलकॉक | ६५६-४ |
| १९५१-५४ | १०२-१४ | सेंट्रल | १४५-८ | बॉम्बे ट्रॅम | १५८-० | बॉंबे स्टीम | ८२५-० |
| १९५७ | १०३-६ | इंडिया | २६९-० | टाटा हायड्रो | २३१-० | न्यू इंडिया | १२५-० |
| १९५९-६१ | १०३-६ | इंपी० | २९८०-० | टाटा पॉवर | २११०-० | शिवराजपुर | ५९-० |
| १९६३-६५ | १०३-१३ | | ७९७-८ | | | टाटा केमिकल | २८-० |
| १९६६-६८ | १०३-१४ | रिझर्व्ह | १६९-० | | | टाटा ऑईल | १३०-० |
| १९७०-७५ | १०४-१ | युनियन | १९-१२ | | | | |

## शेड्यूल्ड बँकांच्या परिस्थितीचे तुलनात्मक आकडे

( आकडे हजार रुपयांचे )

| | ३१-५-१९४६ | २४-५-१९४६ | १-६-१९४५ | १-९-१९३९ |
|---|---|---|---|---|
| १. हिंदुस्थानांतील मागणीबरहुकूम द्यावयाचें देणें | ७०३,२५,८६ | ७०८,०१,०५ | ६२५,३४,९७ | १३४,३६,४९ |
| २. हिंदुस्थानांतील मुद्दती देणें | ३०८,४४,११ | ३०६,६३,८३ | २३२,६६,७७ | १०२,२४,३४ |
| ३. हिंदुस्थानांतील रोख शिल्लक | ३५,७३,१४ | ३६,२३,८२ | ३०,९९,२५ | ६,६९,९२ |
| ४. रिझर्व्ह बँकेजवळ ठेव | ९५,५३,३७ | ८८,४२,०५ | ९०,३१,५८ | २५,१७,१९ |
| ५. हिंदुस्थानांत दिलेलीं कर्जें | ३६८,०३,९२ | ३७१,२०,४० | २७६,५९,९० | १०१,५२,१६ |
| ६. हिंदुस्थानांत डिस्कौंट केलेल्या हुंड्या | २०,७७,८२ | १९,९१,०२ | १४,०५,३४ | ३,५७,२९ |

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

---

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | „ १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | „ ४,६२,३०० |
| एकूण खेळतें भांडवल | „ ५०,००,००० |

---

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम, एलूएल. बी.,
मॅनेजर

चिं. त्रिंबक चितळे
मॅ. डायरेक्टर



# पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | " Cencobank " | नं. ११ |

## मुख्य कचेरीः—लक्ष्मीरोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर



# दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.



# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| खपलेलें भांडवल | : | २,९७,६७,१०० रु. |
| वसूल झालेलें भांडवल | : | १,४८,८३,५५० रु. |
| रिझर्व्ह फंड | : | १,८३,३३,५५० रु. |

मुख्य कचेरी : ओरिएन्टल बिल्डिंग मुंबई.

—शाखा—

| | |
|---|---|
| अहमदाबाद | कोइमतूर |
| भद्र ( मुख्य ऑफिस ) | हैद्राबाद ( सिंध ) |
| एलिस ब्रिज | जमशेदपूर |
| स्टेशन ब्रँच | जुनागड |
| माणेक चौक | कराची |
| अमृतसर | मद्रास |
| अंधेरी ( मुंबई शेजारीं ) | नागपूर |
| वांद्रे ( मुंबई शेजारीं ) | किंग्जवे |
| भुज ( कच्छ ) | इतवारी बझार |
| मुंबई | पालनपूर |
| बुलियन एक्सचेंज | पुणें |
| कुलाबा | पुणें शहर |
| काळबादेवी | राजकोट |
| मलबार हिल | सुरत |
| कलकत्ता | वेरावळ |
| क्लाईव्ह स्ट्रीट ( मुख्य ऑफिस ) | |
| बडा बझार | |
| चौरंगी स्क्वेअर | |

लंडन एजन्ट्स : दि वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

न्यूयॉर्क एजन्ट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

—डायरेक्टर्स—

सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. ( चेअरमन ); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के, नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण; ना. सर शांतिदास आस्करण, नाइट; श्री. महंमद सुलेमान कासम मिठा.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

कांहीं ठिकाणें सोडून दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० पेक्षां अधिक शिलकेवरील व्याज फक्त खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं.

कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य दरानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

वुइल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते आणि ट्रस्टींचें सर्वसाधारण काम स्वीकारते. अर्ज करून नियम मागवावेत.

सर्वसाधारण बँकिंगचा व्यवहार केला जातो.

एच्. ए. करीमभॉय
एजंट

# स्फुट विचार

## हिंदुस्थानांतील अन्नधान्य परिस्थिति

हिंदुस्थानांतील अन्नधान्य परिस्थिति चालू वर्षाच्या जुलै-ऑगस्ट--सप्टेंबरमध्यें बिकट होणार असा अंदाज बऱ्याच ठिकाणीं करण्यांत आलेला आहे. सर्व हिंदुस्थानांत दर माणशीं मिळणाऱ्या शिध्यांत २५ टक्के कपात नुकतीच करण्यांत आलेली आहे. आणखी २५ टक्के कपात होण्याचा संभव आहे अशा तऱ्हेच्या वार्ता मधून मधून प्रसृत होतात. पण त्या वार्तांना अजून अधिकृत पाठिंबा मिळालेला नाहीं. अमेरिकेंतील धान्यसमृद्धी इतक्या टोकाला गेलेली आहे कीं तेथील जनावरांनासुद्धां अद्याप गहूं चारण्यांत येत आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'अनरा' ह्या धान्य संस्थेला खुल्या बाजारांतच धान्य विकत घ्यावें लागतें. अमेरिकन बँकांच्या हातीं अमेरिकन शेती असल्यामुळें अनरापेक्षा अधिक किंमत देणाऱ्या कोणालाहि धान्य विकत घेतां येतें, व अनराला तें मिळूं शकत नाहीं अशीहि वार्ता मध्यंतरीं येऊन गेली. त्यांत तथ्य असेल तर अमेरिकन सरकारने अनराला धान्य सक्तीने विकत घेऊन दिलें पाहिजे. दरम्यान ब्रह्मदेश व सयाम यांच्याकडून हिंदुस्थानला ८५ हजार टन तांदूळ जुलैपर्यंत मिळणार असल्याचें समजतें. त्यांपैकीं ७० हजार टन हिंदुस्थानांत आलाहि आहे असें म्हणतात. याशिवाय संयुक्त धान्य-समितीनें ११ लक्ष ६५ हजार टन अन्नधान्य सप्टेंबर अखेर देण्याचें कबूल केलें आहे. यांत तांदुळाचा समावेश केलेला नाहीं. इंडो-नेशिअन सरकारकडून ५ लाख टन तांदूळ मिळूं शकेल; पण सुरबाया समरांग सारखीं बंदरें डच सरकारच्या ताब्यांत आहेत. त्यामुळें वहातुकीची अडचण उपस्थित झाली असून हिंदुस्थान सरकार त्याबद्दल डच सरकाराशी वाटाघाटी करीत आहे. हिंदुस्थानांतील शिलकी प्रांतांतून ३ लक्ष ४० हजार टन गहूहि मिळाला आहे. इतकें धान्य मिळालें असें वाटलें तरी त्याच्या योग्य वाटणीचा प्रश्न शिल्लक राहतोच. हिंदी रेल्वे कामगारांच्या संभाव्य संपामुळें धान्याच्या वहातुकीस अडथळा येण्याची भीति निर्माण झाली आहे. तथापि, संप सुरू होण्यापूर्वीच तुटीच्या भागांकडे शक्य तेवढें धान्य पोंचविण्याची व्यवस्था करण्यांत येत आहे, असें प्रसिद्ध झालें आहे.

---

## ३½% रोख्यांची परतफेड आणि आयुर्विमा कंपन्या

हिंदुस्थान सरकारने ३½% रोख्यांची परतफेड करण्याचा आपला निर्णय २४ मे रोजीं जाहिर केला, त्यावर सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांनी कडक टीका केली आहे. सार्वजनिक संस्था, धर्मादाय संस्था, विधवा व मुलें ह्यांच्या चरितार्थासाठी तरतूद, इत्यादींसाठी ३½% रोख्यांचा अवलंब आज सुमारें १०० वर्षे करण्यांत आला आहे. त्यांच्या उत्पन्नांत प्रस्तुत निर्णयामुळें एकाएकी घट होणार आहे. त्याचप्रमाणें, दीर्घ मुदतीच्या रोख्यांत पैसे गुंतविणाऱ्या विमा कंपन्यांवरहि त्याचा प्रतिकूल परिणाम होणार आहे. हिंदुस्थान सरकारचे त्यामुळें व्याजाचे दरसाल दीड कोटि रुपये वाचतील हें खरें आहे, परंतु त्यामानानें आर्थिक व्यवहारांची बसलेली घडी विस्कटल्यामुळें होणारें नुकसान कितीतरी अपायकारक आहे, असा सर पुरुषोत्तमदास ह्यांचा मुद्दा आहे. "व्याजाचे उतरते दर व कराचा बोजा ह्यांनी विमा कंपन्यांच्या एका डोळ्यास आघात केला असला तर व्याजाच्या उत्पन्नांत अर्ध्या टक्क्याची घट घडवून आणवून त्यांचा दुसरा डोळा फोडला आहे असें सर पुरुषोत्तमदास हे म्हणाले. विमा कायद्याच्या २७ व्या कलमानुसार आयुर्विमा कंपन्यांना आपल्या विम्यांच्या देण्याच्या ५५% इतकी रक्कम सरकारी व कायद्यास मान्य असलेल्या इतर रोख्यांत गुंतवावी लागते. व्याजाचा दर ही बाब आयुर्विमा कंपन्यांस अत्यंत महत्त्वाची असते. कारण कांहीं विशिष्ट दरानें व्याज मिळूं शकेल ह्यावर हप्त्यांचे दर आधारलेले असतात. आयुर्विमा कंपन्यांस रुपयाला ६० पै इतका इन्कम टॅक्स पडतो तो वजा करून पडणारें व्याजच हिशेबांत घ्यावें लागतें. ३½% रोख्यांची सरकार परतफेड करणार आहे त्यामुळें आयुर्विमा कंपन्यांचे व्याजाचें उत्पन्न उतरेल आणि त्याचा हप्त्यांचे दरावर परिणाम होईल. तथापि हप्त्यांचे दर आणखी वाढविण्यास फारशी जागाच नाहीं. कारण हप्ते वाढविल्यास विम्याचें काम मिळविणे कंपन्यांना फार अवघड होणार आहे. लहान विमेदारांना मोठे हप्ते देणें परवडणार नाहीं. अशा परिस्थितींतूनच विमा कंपन्यांस मार्ग काढावा लागणार आहे. इन्कम टॅक्सच्या बाबत त्यांस जास्त सवलत मिळावी ह्या त्यांच्या मागणीचा आतां जास्त जोरान पुरस्कार करण्यांत आला पाहिजे.

---

## वारसा कर विम्यास लागू करूं नका

सर पुरुषोत्तमदास ह्यांनी आपल्या भाषणांत वारसा कराच्या बिलाचा उल्लेख केला आणि कांहीं विशिष्ट रकमेपर्यंतच्या हप्त्यांस इन्कम टॅक्सची माफी आहे तशी वारसा कराचीहि कां असूं नये, असा सवाल टाकला. पैशाची काटकसर करून त्याचें जतन करण्यास आयुर्विम्यांसारखें उपयुक्त साधन नाहीं, अशा परिस्थितींत इतर ठिकाणीं गुंतवलेले पैसे आणि आयुर्विम्यांत गुंतविलेले पैसे ह्यांतील फरक ध्यानांत आणण्याची आवश्यकता सर पुरुषोत्तमदास ह्यांनी प्रतिपादन केली. अमेरिकेच्या कित्येक घटकांनी विमा पॉलिसीच्या रकमांस त्या कोणाचे तरी नांवें लिहून ठेवल्या असल्यास वारसा कर लावलेला नाहीं. हिंदुस्थानांत वारसा कराच्या कक्षेत विम्याची रक्कम येऊं न देण्यास अमेरिकेपेक्षा कितीतरी जास्त सबळ कारणें आहेत. मध्यम वर्गानें युद्धकाळांतील अडचणी सोसूनहि जतन करून शिल्लक टाकलेल्या विम्याचे रकमेवर वारसा कराच्या रूपाने मध्यवर्ती सरकारने झडप घालणें इष्ट होणार नाहीं.

---


## Deccan Institute of Commerce Poona.

(Recognised by Government).

Classes for the 1946-47 Session will begin on Monday the 24th June 1946. Students coached up for G.D.C & C., D. Com. (I. M. C.), R. A. (1st)., G. D. C. & A., Indian Institute of Bankers, Shorthand and Typewriting. Courses suitable for Graduates, Matriculates and Non-Matriculates. Classes in the morning and evening. Prospectus free on application to:

257, C, Budhwar Peth, (Main Road). Opp. Pharaskhana Haud, Poona City. — Secretary.

## दि सह्याद्रि विमा कंपनी लि., नासिक

### वार्षिक सभा

सह्याद्रि विमा कंपनीच्या भागीदारांची व विमेदारांची वार्षिक सभा ता. २५-५-४६ रोजीं कंपनीच्या मुख्य कचेरींत कंपनीचे संचालक खानबहादूर बी. एच. काझी, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. सभेस कंपनीचे भागीदार व विमेदार बऱ्याच मोठ्या संख्येनें उपस्थित होते. प्रारंभीं शेठ शामजी करमसी नागडा, प्राध्यापक के. व्ही. गजेंद्रगडकर आणि श्री. आर. बी. पाटील हे चालू वर्षाकरतां विमेदारांतर्फे कंपनीच्या संचालक मंडळावर बिनविरोध निवडून आल्याचें जाहीर करण्यांत आलें. त्यानंतर कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. गो. ग. सौंदणकर यांनीं संचालकांचा १९४५ सालचा अहवाल सभेस वाचून दाखविला व कंपनीचे १९४५ चे जमाखर्च व ताळेबंद सभेपुढें मंजुरीकरितां ठेवले ते सर्वानुमतें मान्य करण्यांत आले. त्याचप्रमाणें भागीदारांतर्फेचे निवृत्त होणारे संचालक ( १ ) श्री. एम्. एन्. देसाई, टोपीवाले, ( २ ) रा. ब. एन्. बी. देशमुख, ( ३ ) श्री. एम्. जे. दीक्षित, ( ४ ) सरदार एन्. जी. विंचूरकर आणि ( ५ ) श्री. डब्ल्यू. एस. कलघटगी हे पुन्हां निवडून आल्याचें जाहीर करण्यांत आलें. याशिवाय कंपनीचे असिस्टंट मॅनेजर श्री. के. वाय. काळे बी. ए., ए. आय. ए. ( लंडन ) हे ॲक्चुअरी झाल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करण्यांत आलें.

### अभिनंदनीय प्रगति

अहवालाचे सालीं कंपनीकडे रु. ४९/- लाखाचेवर विम्याचें काम येऊन त्यापैकीं रु. ४०/- लाखांचेवर काम पूर्ण करण्यांत आलें. कंपनीच्या कामांत गत वर्षापेक्षां शें. ६० टक्के वाढ झाली असून प्रिमियमचें एकूण उत्पन्न रु. ३८०८९७/ झालें आहे. त्याचप्रमाणें कंपनीचा लाईफ फंड गतवर्षीच्या रु. २,९६,८७० वरून रु. ४,६३,५५४/- पर्यंत गेला आहे. अशा रीतीनें प्रातीचें मान वाढतें असून...कंपनीच्या खर्चाचें प्रमाण शें. ३ टक्क्यांनीं कमी झालें आहे, ही गोष्ट कंपनीच्या व्यवस्थापकांस निःसंशय भूषणावह आहे. कंपनीच्या कार्याचा व्याप मुंबई इलाखा, वऱ्हाड व मध्यप्रांत, बडोदें, इंदोर वगैरे संस्थानें इत्यादि प्रांतांत दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणांत असून लवकरच अखिल भारतीय प्रसाराची योजना हातीं घेण्याचा कंपनीच्या चालकांचा मनोदय आहे. कंपनीच्या या सर्वांगीण प्रगतीबद्दल कंपनीचे व्यवस्थापक, श्री. गो. ग. सौंदणकर, बी. ए, व श्री. वा. का. जोशी, बी. ए., व तसेंच चीफ एजंटस, प्रचाराधिकारी व कंपनीचे सर्व प्रतिनिधी अभिनंदनास पात्र आहेत. कंपनीची सदैव अशीच भरभराट होवो अशी सदिच्छा आम्ही प्रगट करितों.

---

### अ. भा. हातमाग बोर्डावर प्रतिनिधित्व

सन १९४४ च्या जुलै आगस्ट मध्यें भरलेल्या सर्व प्रांतिक रजिस्ट्रार साहेबांच्या सभेंत पास झालेल्या ठराव नंबर ७ ( पो. नि. ७ ) मध्यें विणकर सहकारी संस्थांचे प्रतिनिधी अखिल भारतीय हातमाग बोर्डावर यावे अशी शिफारस होती.

असे प्रतिनिधी नेमणें प्रांतिक सरकारच्या मर्जीवर अवलंबून आहे. जर आपणास सदर अखिल भारतीय हातमाग बोर्डावर प्रांतिक सरकारकडून विणकर सहकारी संस्थांचा प्रतिनिधि नेमला जावा अशी इच्छा असेल तर तुम्ही त्याबद्दल प्रांतिक सरकारकडे आपल्या संस्थेचा ठराव करून मागणी करावी, असें मध्य विभागांतील सर्व विणकर सोसायट्या व इंडस्ट्रिअल असोसिएशन्स ह्यांजकडे एक सर्क्युलर डे. रजिस्ट्रार, को. सो, मध्य विभाग, नाशिक, ह्यांनीं पाठविलें आहे.




विम्याचें महत्त्व आपणांस पटलें आहे ना ?
मग अल्पावधींत लोकांच्या विश्वासास पात्र झालेल्या
**दि सुप्रीम म्यूच्युअल विमा कंपनीची**
आपल्याला पसंत असलेली पॉलिसी घ्या

सढळ अटीवर सर्वत्र एजंट नेमणें आहेत.

—जास्त माहितीसाठीं लिहा अगर भेटा—
मॅनेजर,
दि सुप्रीम म्यु. अ. कं. लि. पुणें
८६६ सदाशिव पेठ, पुणें शहर

